**"शिवभोजन" केंद्रावर घ्यावयाची दक्षता.**

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
**शासन परिपत्रक क्रमांक - शाभोथा-२०१९/प्र.क्र.५१/नापु-१७**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक- १८ जानेवारी, २०२०

वाचा :-१)शासन निर्णय क्रमांक - शाभोथा-२०१९/प्र.क्र.५१/नापु-१७, दि. ०१ जानेवारी, २०२०.
२) शासन परिपत्रक समक्रमांक, दि. ०६ जानेवारी, २०२०.

प्रस्तावना:-

राज्यातील गरीब व गरजू जनतेला सवलतीच्या दरात शिवभोजन उपलब्ध करून देण्यासाठी या विभागाने दि. ०१ जानेवारी, २०२० रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी सुरळीतपणे करण्यासाठी तसेच सदर योजना दिनांक २६ जानेवारी २०२० रोजीपासून यशस्वीरित्या अंमलात आणण्याकरिता मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे अध्यक्षतेखाली दि. १४ जानेवारी, २०२० रोजी झालेल्या बैठकीत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत.

परिपत्रक :-

"शिवभोजन" केंद्रावर पुढील बाबींची दक्षता घेण्यात यावी.

- शिवभोजन थाळीचे खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी शक्यतोवर स्वतंत्र किचनची व्यवस्था करावी.किचनमध्ये अन्न पदार्थ तयार करताना स्वच्छतेचे सर्व निकष पाळले जावेत.
- अन्न पदार्थ तयार करण्यासाठी वापरात आणावयाची भांडी आवश्यकतेनुसार स्टेनलेस स्टीलची असावीत. अन्न पदार्थ तयार करणारे कर्मचारी, त्यांच्या हाताची स्वच्छता, कपडयाची स्वच्छता याबाबत दक्षता घेतील.
- तयार केलेले अन्न पदार्थ स्वच्छ केलेल्या स्टेनलेस स्टीलच्या भांड्यात साठविले जावीत. शिळे अन्न पदार्थ वापरले जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी. तयार केलेले खाद्यपदार्थ दुषित होणार

Scanned by CamScanner

नाहीत अशा प्रकारे झाकुन ठेवण्याची व्यवस्था करण्यात यावी. आवश्यकतेनुसार फ्रिजचा वापर करावा.

- पिण्यासाठी तसेच अन्न पदार्थ तयार करण्यासाठी फिल्टर्ड/ पिण्यायोग्य (Potable Water) पाण्याचा वापर करावा. हात धुण्यासाठी वॉश बेसिनची व्यवस्था करावी. तेथे साबण व निर्जंतुक करण्याची द्रावण ठेवावे.
- महत्वाच्या कार्यपद्धतीसाठी उदा:- भोजन बनविण्याच्या क्रिया, खाद्यपदार्थाची साठवणूक, अन्न पदार्थाचे वितरण कार्यप्रणालीसाठी Standard Operation Procedure (SOP) वापरण्यात यावी.
- शिवभोजन घेणाऱ्यांसाठी स्वच्छ टेबल/खुर्चांची व्यवस्था असावी. या केंद्रातून स्वच्छ, पोषक व पदार्थाची गुणवत्ता राखून ताजे भोजन दिले जाईल.
- एकाच लाभार्थ्यांकडून एकापेक्षा जास्त वेळा थाळी घेतली जावू नये, याची दक्षता घेतली जावी.
- एका शिवभोजन केंद्रावर जास्त गर्दी होण्याची शक्यता असून, गोंधळ निर्माण होण्याची शक्यता आहे. यास्तव प्रत्येक भोजनालयाच्या ठिकाणी आवश्यकतेनुसार स्थानिक पोलिसांमार्फत योग्य ती काळजी घेण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(डॉ. गणेश बडे)
अवर सचिव

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त
२. सर्व जिल्हाधिकारी
३. नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई
४. वित्तिय सल्लागार व उपसचिव (अ.ना.पु. व ग्रा.सं) पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई
५. उपसंचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय मुंबई
६. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
७. सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी
८. निवड नस्ती, नापु-१७.

Scanned by CamScanner